Vol 3 Issue 2 March 2013

Impact Factor : 0.2105

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue. 2,March. 2013
ISSN:-2230-7850
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण ( महाराष्ट्राच्या जडणघडणीतील मा. यशवंतरावजी चव्हाणांचे योगदान )

*बाबुराव निवृत्ती पवार*

राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी

*सारांशः*

भारताच्या स्वातंत्र्य लढयातील एक रणझुंझार सेनांनी आणि स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदापासून देशाच्या उपपंतप्रधानपदापर्यंतची विविध पदे आपल्या कर्तबगारीने समर्थपणे भूशविणारे नेते, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून 13 मार्च 2012 ते 12 मार्च 2013 हे वर्ष संपूर्ण महाराष्ट्रात आनंदोत्सवाने साजरे केले जात आहे.

## *प्रस्तावना व उद्देश :–*

सर्वसामान्य बहुजन समाजातून शिवछत्रपतीनंतर आणि आधुनिक काळात लोकमान्य टिळकानंतर एवढा मोठा नेता महाराष्ट्रात निर्माण झालेला नाही. मागास, दुष्काळी भागातील देवराष्ट्रे सारख्या एका खेडेगावात,गरीब शेतक–यांच्या (कष्टक–यांच्या) घरात जन्माला आलेली एक व्यक्ती, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन स्वतःच्या कर्तृत्वातून, व्यासंगातून आणि जिद्दीतून किती मोठी होवू शकते, याचे प्रतीक म्हणजे अष्टपैलू यशवंतराव चव्हाण होय. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून काम करत असतांना समाजातील सर्व घटकांना बरोबर घेण्याची किमया यशवतंरावांनी एखाद्या जादूगाराप्रमाणे केली. पददलीत, नवबौध्द, शेतमजूर, शेतकरी, कामगार, मध्यमवर्गीय, व्यापारी, कारखानदार, दुष्काळग्रस्त, धरणग्रस्त, विद्यार्थी तसेच शिक्षण, साहित्य व कलेच्या क्षेत्रात वावरणा–या असंख्य नामवंतांचा विश्वास त्यांनी संपादन केला होता. राजकीय शुध्द चारित्र्य, पारदर्शी व समतोल राज्यकारभार, ध्येयनिष्ठ, राष्ट्रनिष्ठ व कुशल प्रशासक इ. त्यांच्यामधील गुणांच्यामुळे त्यांचा राज्यकर्ते व प्रशासनावर आदरयुक्त दरारा होता. महाराष्ट्राने निरनिराळे मुख्यमंत्री आजपर्यंत पाहिले आहेत. परंतु यशवंतरावांचा तोडीचा सर्वकश, सर्वमान्य, कर्तबगार व स्वच्छ प्रतिमेचा नेता अद्यापपर्यंत तरी पाहिलेला नाही. अशा या लोकनेत्याच्या व्यक्तीमत्वाचा, कार्यकर्तृत्वाचा व विचारांचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने प्रस्तुत शोधनिबंधाची निवड केली आहे.

## *जीवनपरिचय :–*

यशवंतरावांचे संपूर्ण नांव यशवंतराव बळवंतराव चव्हाण असे होते. त्यांचा जन्म सांगली जिल्हयातील देवराष्ट्रे या त्यांच्या आजोळी गावी 12 मार्च 1913 रोजी झाला. त्यांच्या आईचे नांव विठाबाई तर वडिलांचे नांव बळवंतराव होते. यशवंतरावांचे वडील शेतकरी होते. पुढे ते बेलिफ म्हणून नोकरीस होते. त्यांच्या घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची होती. ते लहान म्हणजे अवघे चार वर्षाचे असतांनाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यामुळे त्यांच्या पालनपोशणाची जबाबदारी त्यांचे ज्येष्ठ बंधू गणपतराव, ज्ञानदेव व आई विठाबाई यांच्यावर येवून पडली. साहजिकच अतिशय खडतर परिस्थितीत देवराष्ट्रे, कराड, कोल्हापूर, पुणे येथे त्यांना शिक्षण घ्यावे लागले. तथापि, प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन त्यांनी आपले बी.ए.एल.एल.बी. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. दि. 2 जून 1942 रोजी फलटणच्या वेणूताईशी त्यांचा विवाह झाला. सन 1930 ते 1946 या सोळा वर्षाच्या काळात यशवंतराव चव्हाणांनी सातारा जिल्हयातील स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय कार्यकर्ता ते रणझुंझार स्वातंत्र्यसेनानी असे कार्य केले. 1946 ते 1962 या 16 वर्शाच्या काळात त्यांनी मुंबई राज्याच्या मंत्रिमंडळात संसदीय सचिव, विविध खात्याचे मंत्री ते द्विभाषिक राज्याचे व स्वतंत्र महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषविले. 1962 ते 1984 या 22 वर्षाच्या काळात केंद्र शासनात संरक्षण, गृह, अर्थ, परराष्ट्र अशा महत्वाच्या खात्याबरोबरच उपपंतप्रधान व विरोधी पक्षनेते या पदावर महत्वपूर्ण कार्य केले. अशाप्रकारे त्यांनी देवराष्ट्रे कराड ते दिल्ली व्हाया मुंबई असा एकूण 50 वर्षाहून अधिक काळ आपले सार्वजनिक जीवन समर्पित केले. यशवंतराव चव्हाण यांचे दुःखद निधन दि. 25 नोव्हेंबर 1984 रोजी झाले.

## *भारतीय स्वातंत्र्य चळवळ व यशवंतराव :–*

यशवंतरावांच्या जीवनातील 1930 ते 1946 चा कालखंड हा स्वातंत्र्य चळवळीतील संघर्षाचा होता. या काळात भारतात ब्रिटिशांच्या विरोधी कॉंग्रेस पक्षाने सुरु केलेली स्वातंत्र्य चळवळ खेडयापाडयापर्यंत पोहोचलेली होती. त्यामुळे यशवंतराव चव्हाण शालेय शिक्षण कराडमध्ये घेत असतानाच यात सहभागी झाले. 1930 च्या कायदेभंग चळवळीत यशवंतरावांनी विद्यार्थीदशेतच कराडमधील तरुण मंडळी जमवून प्रभातफेरी काढणे, टिळक हायस्कूलच्या पुढील लिंबाच्या उंच झाडावर राष्ट्रध्वज फडकावणे वगैरे धाडशी कामे केली होती. त्याबद्दल त्यांना अटकही झाली होती. 26 जानेवारी 1932 ला कायदेभंग सत्याग्रहाचा भाग म्हणून यशवंतरावांनी झेंडावंदन केले व स्वतः वंदेमातरम् म्हटले यासाठी त्यांना

**Title :** *आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण ( महाराष्ट्राच्या जडणघडणीतील मा. यशवंतरावजी चव्हाणांचे योगदान )*
**Source:Indian Streams Research Journal [2230-7850 ]** *बाबुराव निवृत्ती पवार* **yr:2013 vol:3 iss:2**

वयाच्या 17 व्या वर्षीच 18 महिन्यांच्या तुरुंगवासाची (सक्तमजूरीची) शिक्षा झाली. तुरुंगातून सुटका झाल्यानंतर सातारा जिल्हा कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्यावर आली. त्यामुळे यशवंतरावांचा संपूर्ण जिल्हयात संपर्क वाढला आणि कार्यकर्त्यांचे जाळेही वाढले. या काळात त्यांना अनेक जिवलग व सच्चे कार्यकर्ते मिळाले. 1942 च्या ' चलेजाव 'आंदोलनात त्यांनी भूमिगत राहून संपूर्ण पुणे विभागात सत्याग्रहाचे सूत्रसंचालन केले. याच काळात सातारा जिल्हयात सुरु असलेल्या ' प्रतिसरकारच्या ' आंदोलनाशी त्यांचा संपर्क होता. शिरवडे रेल्वे स्टेशन जाळणे व इतर कार्यासाठी त्यांनी भूमिगत राहून मार्गदशन केले. मे 1943 रोजी त्यांना आजारी असतांना फलटण येथे अटक करण्यांत आली. त्यांना दोन भाषणाबद्दल 5 व 6 महिने शिक्षा झाली. त्यानंतर जानेवारी 1944 मध्ये त्यांची तुरुंगातून सुटका झाली. स्वातंत्र्य लढयातील सहभागाबद्दल पुन्हा फेब्रुवारी 1944 मध्ये फलटण येथे अटक झाली व तीन महिन्यांच्या पॅरोलनंतर यशवंतरावांची पूर्ण मुक्तता करण्यांत आली. अशाप्रकारे व्यापक राष्ट्रहितासाठी जी त्यागाची वृत्ती असावी लागते ती चव्हाणसाहेबांच्याकडे निसर्गतः होती. त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत एक थोर सेनानी म्हणून केलेले अत्यंत संघर्षमय कार्य हे प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे.

### *संसदीय कारकिर्दीचा श्रीगणेशा :–*

1946 च्या प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणूकीत कॉंग्रेस पक्षाच्यावतीने यशवंतराव सातारा दक्षिण मतदार संघातून मुंबई प्रांताच्या विधानसभेवर निवडून आले. मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी त्यांचा गृहखात्याचे संसदीय सचिव (पार्लमेंटरी सेक्रेटरी) म्हणून मंत्रिमंडळात समावेश केला. त्यामुळे यशवंतरावांचा प्रथमच शासनात व सत्तेत प्रवेश झाला. या काळात प्रशासनात काम कसे करावे याचे धडे त्यांना मिळालेच पण लोकाभिमुख व जनहिताचे निर्णय अधिका–यांना विश्वासात घेवून कसे घ्यावयाचे याचेही शिक्षण त्यांना मिळाले. या काळात त्यांनी महत्वपूर्ण तीन निर्णय घेतले. होमगार्ड संघटना स्थापन करणे, आणि त्यांची कार्यवाही, तमाशा कलेला उत्तेजन देण्यासाठी तमाशा बोर्ड, प्रवासी वाहतूक सेवेचे राष्ट्रीयीकरण हे ते निर्णय होते. यानंतर स्वतंत्र भारतात 1952 च्या सार्वत्रिक निवडणूकीत कराड विधानसभा मतदार संघातून ते मुंबई राज्याच्या विधानसभेवर निवडून आले. मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात ते नागरी पुरवठा, सामजाकल्याण, वन खात्याचे मंत्री झाले. ऑक्टोबर 1956 पर्यंत राज्याच्या मंत्रिमंडळातील एक प्रभावी, अभ्यासू मंत्री म्हणून त्यांनी यशस्वीपणे कार्य केले.

### *मुख्यमंत्री यशवंतराव :–*

यशवंतराव चव्हाणांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होण्याची संधी चारवेळा मिळाली. विशाल द्विभाषिक झाल्यानंतर ते प्रथम 1 नोव्हेंबर 1956 ला मुख्यमंत्री झाले. 1957 च्या निवडणूकीनंतर द्विभाषिक मुंबई राज्याचे पहिले व शेवटचे मुख्यमंत्री होण्याची दुसरी संधी त्यांना मिळाली. 1 मे 1960 ला मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर ते स्वतंत्र महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले आणि 1962 च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर एप्रिल 1962 मध्ये ते पुन्हा मुख्यमंत्री झाले. पुढे सहा महिन्यांतच पंतप्रधान नेहरुंच्या आमंत्रणावरुन ते केंद्र सरकारमध्ये गेले. त्यामुळे त्यांना मुख्यमंत्री म्हणून 6 वर्षाचा कालावधी मिळाला याच महत्वाच्या कालखंडात त्यांनी आधुनिक महाराश्ट्राची पायाभरणी केली.

### *राष्ट्रीय नेते यशवंतराव :–*

1962 मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले आणि नेहरुंनी यशवंतराव चव्हाणांना संरक्षण मंत्री म्हणून केंद्रीय मंत्रिमंडळात नियुक्त केले. हे पद त्यांनी अतिशय कार्यक्षमतेने व आत्मविश्वासाने सांभाळले. देशाचे मानसिक धैर्य वाढविले. हिमालयाच्या मदतीला सहयाद्री धावून गेला. असे या घटनेचे वर्णन केले गेले. यानंतर पंतप्रधान लालबहादूर शास्त्रीजींच्या मंत्रिमंडळातही त्यांनी संरक्षण मंत्रीपद भूशविले. या काळात 1965 मध्ये पाकिस्तानने भारतावर केलेले आक्रमण यशस्वीपणे परतवून लावलेच त्याचबरोबर या युध्दात पाकिस्तानचा नामुश्कीजन्य पराभव करुन देशाचे मानसिक धैर्य त्यांनी वाढविले. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळात 1966 ते 1977 पर्यंत यशवंतरावांनी गृह, अर्थ, परराष्ट्र अशी महत्वाची मंत्रिपदे भूशविली. 1977 च्या लोकसभा निवडणूकीत कॉंग्रेसचा पराभव होवून देशाची सत्ता जनता पक्षाच्या हाती गेली. तेंव्हा संसदेतील विरोधीपक्षनेते म्हणून त्यांनी महत्वपूर्ण जबाबदारी पार पाडली. तसेच 1979 साली चौधरी चरणसिंग यांच्या मंत्रिमंडळात उपपंतप्रधान म्हणून अल्पकाळ कार्य केले. तसेच कॉंग्रेसच्या विभाजनानंतर इंदिरा गांधी विरोधी स्वर्णसिंग कॉंग्रेस (एस) चे नेतृत्वही त्यांनी कांहीकाळ केले. 1980 च्या निवडणूकीत कॉंग्रेस (आय) सत्तेवर आल्यानंतर ते परत स्वगृही आले. आठव्या केंद्रीय वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी कार्य केले. अशाप्रकारे 1962 ते 1984 अशा 22 वर्षाच्या काळात ते राष्ट्रीय पातळीवरील नेते म्हणून कार्यरत राहिले.

### *संयुक्त महाराष्ट्र लढा आणि यशवंतराव :–*

1955 ते 1960 या दरम्यानचा ' संयुक्त महाराष्ट्र आंदोलना 'चा कालखंड हा यशवंतराव चव्हाणांच्या राजकीय कारकिर्दीतील अत्यंत खडतर, कठीण असा कालखंड होता. या काळातच यशवंतरावांचे नेतृत्व तावूनसुलाखून निघाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राज्यपुनर्रचना समितीचा अहवाल स्वीकारुन भारतात 1956 साली 14 भाशिक घटक राज्ये निर्माण करण्यांत आली. परंतु मराठी भाशिक जनतेला त्यांच्या मागणीप्रमाणे स्वतंत्र महाराष्ट्र राज्य मिळाले नाही. त्यामुळे येथील जनतेत केंद्र सरकार व कॉंग्रेस पक्षाविषयी असंतोश निर्माण झाला. यातूनच येथील सर्व मराठी भाषिक जनतेने ' संयुक्त महाराष्ट्र समिती 'च्या नेतृत्वाखाली पक्षविरहित आंदोलन सुरु केले. परंतू मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी ते पोलीसी बळाचा अतिरेकी वापर करुन चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला. आंदोलकावर गोळीबार करण्याचे आदेश मोरारजीनी पोलीसांना दिले. त्यामुळे निर्दयीपणे पोलीसांनी केलेल्या ठिकठिकाणच्या गोळीबारात संयुक्त महाराष्ट्राचे 105 सत्याग्रही हुतात्मे झाले. त्यामुळे मराठी भाषिक प्रक्षुब्ध बनले. यातच केंद्र सारकाने महाद्विभाषिक राज्याची घोषणा केली. 1 नोव्हेंबर 1956 रोजी यशवंतराव चव्हाण यांची राज्याचे मुख्यमंत्री निवड केली. परंतू मराठी भाषिकांना हे द्विभाषिक राज्य नको होते. त्यांनी यशवंतरावांचा सुर्याजी पिसाळ, राज्यद्रोही, गद्दार अशा भाषेत निर्भत्सना केली व आंदोलन अधिक तीव्र केले. सर्वत्र मोर्चे, निदर्शने, संप, लाठीमार सुरु होते. मात्र यशवंतरावांनी हया आंदोलनाबाबत अत्यंत सामंजस्याची भूमिका घेतली. त्यांनी स्वतःचा संयम कधीही ढळू दिला नाही. त्यांनी आगपाखड करणा–या विरोधी पक्षीयांना कधी चुचकारुन तर कधी मवाळ बोलून त्यांचा विरोध बोथट करण्यात यश प्राप्त केले. आंदोलकांच्यावर कोणत्याही परिस्थितीत गोळाबीर करायचा नाही असे आदेश त्यांनी पोलीसांना दिले. त्यामुळे अशाही परिस्थितीत त्यांनी जनतेचा विश्वास संपादन करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. 1957 च्या सार्वत्रिक निवडणूकीत मुंबई, कोकण व प. महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीने कॉंग्रेसचा जबरदस्त पराभव केला. परंतू विदर्भ, मराठवाडा व गुजरातमधील यशाच्या अल्प बहुमताच्या जोरावर कॉंग्रेसला सत्ता प्राप्त होवून यशवंतराव पुन्हा मुख्यमंत्री बनले. या निवडणूकीत जनतेने द्विभाषिक मुंबई राज्य अमान्य असल्याचा स्पष्ट कौल दिला. कॉंग्रेस व नेहरुच्या विशयी मराठी भाशिकात निर्माण झालेला प्रचंड असंतोष कमी करण्यासाठी यशवंतरावांनी पं. नेहरुंना प्रतापगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाच्या अनावरणासाठी आणले. त्यावेळी मराठी भाषिकांनी त्यांच्यासमोर उग्र निदर्शने करुन संयुक्त महाराष्ट्र प्रश्नांची तीव्रती किती आहे दाखवून दिले. यशवंतरावही सुरुवातीपासूनच

महाराष्ट्रवादी होते. परंतू कॉंग्रेसमधील गुजराती व महराष्ट्रद्वेष्टयांनी हा प्रश्न चिघळलेला होता. त्यामुळे त्यांचाही कोंडमारा झाला होता. तसेच त्यांची नेहरुवर अढळ निष्ठा होती. त्यांनी या दरम्यान 'राज्यापेक्षा नेहरु मोठे' अशी कांहीशी वादग्रस्त भूमिका घेतली होती. त्यामुळे मराठी भाषिकांच्या रोशाला त्यांना सामोरे जावे लागले. काही भागात त्यांना फिरणेही मुश्कील झाले होते. तरीही त्यांनी अत्यंत संयमाने मुत्सद्दी व सहिष्णुवृत्तीने राज्याचे नेतृत्व सांभाळले. दिल्लीतील महाराष्ट्रधार्जिण्या कॉंग्रेस नेत्यांना त्यांनी या प्रश्नांचे महत्व पटवून दिले. महाराष्ट्रवादी असणा–या यशवंतरावांना कॉंग्रेस श्रेष्ठी, शासन व जनता यांच्याशी सुसंवाद साधतांना तारेवरची कसरत करावी लागत असे. द्विभाषिक राज्याचा प्रयोग यशस्वी होणे शक्य नाही, हे कटुसत्य हट्टी, केंद्रीय नेतृत्वाला पटवून देण्यात कांही काळाने यशवंतरावांना यश आले. तसेच संयुक्त महाराष्ट्र निर्मितीची चळवळ येथील जनतेने निर्धाराने, सातत्याने, तीव्रतेने व एकजुटीने चालविल्यामुळे शेवटी केंद्र सरकारला नमते घ्यावे लागले आणि 1 मे 1960 रोजी स्वतंत्र मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली आणि या स्वतंत्र महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणांची निवड झाली. अशाप्रकारे संयुक्त महाराष्ट्राचा कलश आणण्यात त्यांना यश आले. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती ही यशवंतरावांच्या राजकीय कर्तृत्वातील कळस होता.

### *आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार :–*

ना. यशवंतराव चव्हाण हे द्विभाषिक मुंबई राज्याचे 1956 ते 1960 या काळात मुख्यमंत्री होते. परंतु या काळात संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलनामुळे त्यांची कारकिर्द अत्यंत वादग्रस्त व संघर्षात गेली. परंतू स्वतंत्र मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून त्यांनी जबाबदारी स्वीकारल्यानंतर राज्याची नव्याने उभारणी करणे आणि सर्वांगीण विकास घडवून आणणे हे उद्दिष्ट त्यांनी निश्चित केले. तसेच मराठी भाषिक जनतेची नव्या राज्याकडून असणा–या अपेक्षांची पूर्तता करणेसाठी त्यांनी अत्यंत दमदार, नियोजनपूर्वक, संघटनात्मक, समतोल पध्दतीने, विकास कार्याला सुरुवात केली. यशवंतराव हे द्रष्टे प्रशासक होते. त्यांनी महाराष्ट्राचे अनक, शिल्पकार या भूमिकेतून केलेल्या विविधांगी कार्याचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

### *1.पुरोगामी महाराष्ट्र :–*

ना. यशवंतराव चव्हाण यांच्यावर म. फुले, राजर्शी शाहू महाराज यांच्या पुरोगामी व सामाजिक विचारांचा प्रभाव होता. त्यांनी महाराश्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून कार्य करत असतांना राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रात पुरोगामी विज्ञानवादी व प्रगत विचारांना, सुधारणांना, निर्णयांना प्राधान्य दिले. सर्व धर्माच्या, जातीच्या, भाषेच्या, प्रदेशाच्या लोकांच्या विकासासाठी समान पातळीवर प्रयत्न केले. बदलत्या परिस्थितीत व प्रवाहानुसार नवीन तंत्रज्ञानाचा, धोरणांचा राज्याचा विकासासाठी वापर करुन महाराष्ट्राची देशातील एक पुरोगामी राज्य अशी प्रतिमा निर्माण केली.

### *2.शिक्षणाला प्राधान्य :–*

महाराष्ट्रात अनेक शिक्षणमहर्शींनी शिक्षणाचा प्रसार सर्वत्र केलेला होता. तरीही समाजातील कांही वंचित, गरीब घटक शिक्षणापासून दूर राहिलेला आहे. हे ओळखून यशवंतरावांनी शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करुन ते गरीबांच्यापर्यंत पोहोचविण्याचे धोरण स्वीकारले. शिक्षणातून 'यशाचा'यशवंत होतो असे ते स्वतःचे उदाहरण देवून शिक्षणाचे महत्व लोकांना पटवून देत असत. त्यांनी स्वतः अत्यंत गरिबीत जिद्दीने शिक्षण घेतले होते आणि शिक्षणाने जीवन कसे उजळते हेही पाहिले होते. गरीब विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोचायचे असेल तर त्यांना मोफत शिक्षण मिळाले पाहिजे. अशी त्यांची भूमिका होती. म्हणूनच मुख्यमंत्री होताच त्यांनी आर्थिकदृष्टया मागासवर्गातील विद्यार्थ्यांना निःशुल्क शिक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. त्यानुसार सुरुवातीस 900 रु. वार्षिक उत्पन्नाखालील कुटूंबाच्या मुला–मुलींना शिक्षणासाठी फी माफ करुन शिक्षणाचे दरवाजे उघडे केले. पुढे उत्पन्नाची मर्यादा 1200 रु,4800 रु, अशी वाढत गेली. त्यांच्या या दूरदर्शी व धाडशी निर्णयामुळे अनेक पिढया शिक्षण घेवून उभ्या राहिल्या. त्यातूनच आजचा प्रबळ सुशिक्षित महाराष्ट्र साकारला. आज महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञानात आधाडीवर आहे. पण त्याचे मूळ कारण त्यांनी शिक्षणाचा पाया रुंदावला आणि मजबूत केला हे आहे. राज्यात शिक्षणप्रसारासाठी त्यांनी ग्रामीण भागात शाळा, महाविद्यालये सुरु करण्यास प्रोत्साहन दिले. त्यांना अनुदान दिले. तसेच सातारा येथे भारतातील पहिली सैनिक शाळा सुरु केली. सर्वसाधारण शिक्षणाबरोबरच तांत्रिक शिक्षणही सर्वसामान्यांपर्यंत पोचले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता म्हणून त्यांनी कराड, औरंगाबाद येथे अभियांत्रिकी महाविद्यालये सुरु करुन राज्यात इंजिनिअरिंग, मेडीकल महाविद्यालये सुरु करण्यास प्रोत्साहन दिले. उच्च शिक्षणाच्या सोयीसाठी त्यांनी मराठवाडा विद्यापीठ (1958) शिवाजी विद्यापीठ (1962) या ग्रामीण भागातील विद्यापिठांची स्थापना केली. आदिवासींच्या मुला–मुलींना शिक्षण मिळावे म्हणून आश्रमशाळा सुरु केल्या. शिक्षणाचा हा विस्तार आणि शैक्षणिक सवलती यामुळे बेकारांच्या फौजा निर्माण होतील, अशी टीका कांहीनी यावर केली. तेंव्हा यशवंतराव म्हणाले, '' अशिक्षितांच्या फौजेपेक्षा सुशिक्षितांची फौज मला परवडेल कारण शिक्षणामुळे पुढे असलेल्या प्रश्नावर विचार करुन ते सोडविण्याचे प्रयत्न तरी ते करतील. '' यावरुन ते शिक्षणाविषयी किती आग्रही होते हे स्पष्ट होते.

### *3.कृषीधोरण :–*

भारताला एकाच संस्कृती आहे, ती म्हणजे कृषी संस्कृती, हा पंडित नेहरुंचा विचार यशवंतरावांनी प्रमाण मानला. 70ः समाज शेतीवर अवलंबून आहे, ती शेती सुधारायची असेल तर प्रथम शेतकरी शहाणा झाला पाहिजे म्हणूनच त्यांनी राज्यात शेती शाळा, शेतकी महाविद्यालये सुरु केली. तसेच म. फुले कृशी विद्यापीठ राहुरी येथे स्थापन केले. कसेल त्याची जमीन ही राष्ट्रीय पातळीवर कॉंग्रेसने घेतलेली भूमिका महाराष्ट्रात कार्यवाही करण्यासाठी त्यांनी कमाल शेतजमीन धारणा कायदा केला. या कायद्याने उपलब्ध झालेल्या जमिनीवर पिके घेण्यासाठी त्यांनी महाराष्ट्र कृशी मंडळ स्थापन केले. कूळ कायद्याने कसणा–या लाखो कुळांच्या मालकीची जमीन झाली. पिढयान् पिढया शेतमजूर म्हणून राबणारे हे कष्टकरी शेतकरी झाले. जमिनीचे फेर वाटप होवून कुळे स्वतंत्र झाल्यामुळे ग्रामीण भागात क्रांतीकारक बदल झाला. शेतकरी हा महाराष्ट्राचा प्राण आहे असे यशवंतराव नेहमी म्हणत असले तरी, केवळ शेतीवर अर्थव्ययवस्था उभी राहू शकत नाही हे त्यांना माहीत होते. म्हणून त्यांनी कृषी औद्योगिक समाजरचनेची कल्पना मांडून ती कार्यवाहीत आणली. शेतीला जोड व्यवसाय किंवा पूरक उद्योग उभारुन ग्रामीण औद्योगिकीरणाचा पाया घातला. कापूस पिकविणा–या शेतक–यांना सूतगिरणी, भुईमूग उत्पादकांना तेलगिरण्या, उसाच्या क्षेत्रात साखर कारखाने अशी रचना त्यांनी केली. कापूस एकाधिकार योजना राबवून कापूस उत्पादकांना भावाची हमी दिली. शेतीसाठी आवश्यक पाणीपुरवठा, खते, नवीन तंत्रज्ञान, सुधारित बियाणे, किटकनाशके, अत्याधुनिक अवजारे, उपलब्ध करुन देण्यासाठी नवीन धोरण ठरविले. शेतीला कर्जपुरवठा करण्यासाठी भूविकास बॅंका, जिल्हा मध्यवर्ती बॅंका, ग्रामीण पतपुरवठा संस्था स्थापन केल्या. शेतक–यांच्या शेतीमालाला हमी

भाव मिळावा यासाठी खरेदी विक्री संघ व इतर संस्था उभ्या केल्या. थोडक्यात ग्रामीण भागातील गरीब शेतकरी आर्थिकदृष्टया प्रगत व्हावा या पध्दतीचे कृषीविषयक धोरण ठरविले.

***4.औद्योगिक धोरण :—***

महाराष्ट्राची प्रगती व्हावयाची असेल तर येथे मोठया प्रमाणात उद्योगधंदे उभे राहिले पाहिजेत याची जाणीव यशवंतराव चव्हाणांना होती. त्यामुळे औद्योगिकरणाबाबत महत्वपूर्ण निर्णय घेतले. मुंबईतील उद्योजकांना 'त्यांचे उद्योग इतरत्र हलविणार नाही' असे ठोस आश्वासन त्यांनी दिले व ते कायम ठेवले. तसेच मुंबई व ठाणे परिसरात खाजगी उद्योजकांना कारखाने उभारण्याला त्यांनी प्रोत्साहन दिले. मुंबई बाहेरही औद्योगिकीकरण व्हावे म्हणून राज्यभर औद्योगिक वसाहती (एमआयडीसी) ची स्थापना केली आणि ती प्रत्यक्ष कार्यवाहीत आणली. शासनाबरोबरच महानगरपालिका, नगरपालिका, सहकारी व खाजगी क्षेत्रांनाही अशा औद्योगिक वसाहती स्थापन करण्यास अनुमती दिली. याबाबतीत असा निर्णय घेणारे महाराष्ट्र राज्य देशात पहिले ठरले. यशवंतरावांच्या या दूरदर्शी निर्णयामुळेच महाराष्ट्रातील उद्योगक्षेत्राात एक नवे युग सुरु झाले आणि अल्पावधीतच महाराष्ट्रात उद्योगधंद्याचे जाळे निर्माण झाले आणि औद्योगिक प्रगतीत देशात महाराष्ट्र अग्रेसर राहिले.

***5.वीजनिर्मिती व घरबांधणी :—***

शेती व उद्योगासाठी पुरेशा वीजपुरवठा व पाणीपुरवठा होणे महत्वाचे आहे. हे यशवंतरावांनी ओळखले होते. सातारा जिल्हयात कोयना धरण बांधून जलविद्युत प्रकल्प सुरु केला. 16 मे 1962 ला कोयनेचे पहिले विद्युत जनित्र त्यांच्याहस्ते सुरु झाले. मुंबई बाहेर पश्चिम महाराष्ट्राला यातून प्रथमच वीज मिळाली. महाराष्ट्राची भाग्यवर्धिनी म्हणून कोयना प्रकल्पाला महत्व प्राप्त झाले. मराठवाडयाचा कायापालट करणारा पूर्णा प्रकल्प आणि विदर्भातील औष्णिक विद्युत केंद्र हे भव्य प्रकल्प त्यांनी सुरु केले. यामुळे महाराष्ट्राची भावी दिशा स्पष्ट झाली. शेतीच्या सर्वांगीण विकासासाठी पाणी पुरवठा होणे गरजेचे आहे. तसेच महाराष्ट्रातील बहुतांश प्रदेश पाण्यापासून वंचित आहे. त्यांना पाणी मिळाल्याशिवाय ग्रामीण भागाचा विकास होणार नाही. हे ओळखून यशवंतरावांनी राज्यातील अनेक नद्यांच्यावर धरणे बांधून कालवा, लिफ्ट इरिगेशन याद्वारे शेतीस पाणीपुरवठा करणा—या विहीर खुदाई सारख्या अनेक योजनांना पाठबळ दिले.

***6.सहकार चळवळीला प्रोत्साहन :—***

यशवंतराव हे समाजवादी विचारांचे होते.त्यांचा नेहरुंच्या लोकशाही समाजवादावर विश्वास होता. महाराश्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी राज्याचे आर्थिक धोरण निश्चित करीत असतांना सहकारी चळवळीला प्राधान्य दिले. ग्रामीण भागातील लहान व गरीब शेतक—यांना विकास करायचा असेल, त्याच्या शेतीमालाला योग्य हमीभाव मिळवून द्यावयाचा असेल आणि शेतीमालावर प्रक्रिया करणा—या उद्योग धंद्याचे उत्पादकांना मालक, भागीदार बनवायचे असेल तर सहकाराशिवाय पर्याय नाही याची जाणीव त्यांना होती म्हणूनच त्यांनी सहकारी चळवळीला बळ देवून राज्यभर सहकारी संस्थांचे जाळे उभे केले. सामान्य लोकांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सहकारी साखर कारखाने, दूध संस्था, तेलगिरण्या, बॅंका, पतसंस्था, जलसिंचन योजना, ग्राहक भांडारे यासारखे, अनेक उद्योगधंदे सहकारी तत्वावर उभे केले. त्यांच्याच कारकिर्दीत देशातील पहिला सहकारी साखर कारखाना 1957 मध्ये कै. विठ्ठलराव विखेपाटील यांनी प्रवरानगर येथे सुरु केला. त्यांच्या काळात राज्यात एकूण 18 सहकारी कारखाने सुरु झाले. महाराष्ट्र हे सहकारी साखर कारखान्याबाबत देशात अग्रेसर राज्य यशवंतराव चव्हाणांच्यामुळेच ठरले. सहकारी अर्थव्यवस्था ही पूरक व पर्यायी अर्थव्यवस्था ठरु शकते. सहकार हा भांडवलशाहीवरचा उतारा धरु शकतो असे त्यांचे मत होते. शेती, उद्योग आणि सहकार यांची सांधेजोड करण्यासाठी यशवंतरावांनी आर.जी.सरघ्या, वैकुंटभाई मेहता, डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचे सहकार्य घेतले.

***7.पंचायत राज्य योजनेचे प्रणेते :—***

यशवंतराव चव्हाण हे लोकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते होते. ग्रामीण भागातील शेवटच्या माणसांपर्यंत सत्ता पोहोचली पाहिजे. राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे, यासाठी सुरुवातीपासून ते आग्रही होते. म्हणूनच महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर लगेच त्यांनी तत्कालीन महसूल मंत्री वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वाखाली एक कमिटी स्थापन करुन पंचायत राज्य व्यवस्थेविषयीचे धोरण स्पष्ट केले आणि या कमिटीच्या शिफारशीनुसार 1961 मध्ये महाराष्ट्रात पंचायत राज्यविशयक कायदा मंजूर केला आणि 1 मे 1962 रोजी पंचायत राज योजनेचा प्रारंभ त्यांनी केला. महाराष्ट्र राज्याच्या विकासाला गती यावी, स्थानिक विकासाचे प्रश्न स्थानिक पातळीवरच सुटावेत, त्यात स्थानिक जनतेचा, कार्यकर्त्यांचा सहभाग लाभावा म्हणून महाराष्ट्रात जिल्हापरिषद, पंचायत समितीची निर्मिती करुन सत्ताविकेंद्रीकरणाचे तत्व यशवंतरावांनी प्रत्यक्षात आणले. जिल्हा परिषदद्वारे सत्तेच्या विकेंद्रीकरणाची प्रक्रिया त्यांनी बळकट केली. लोकशाही गावपातळीपर्यंत पोचविण्याचा तो महत्वपूर्ण प्रयोग होता. खेडयापाडयात राहणारी सामान्य माणसे पंचायतराज संकल्पनेमुळे आपला विकास आपणच करण्यासाठी सज्ज होवू लागली. पंचायत राज्याच्या निर्मितीमुळे एखाद्या ज्योतीने अनंत ज्योती प्रज्वलित व्हाव्यात त्याप्रमाणे यशवंतरावांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून विकासोन्मुख नवनेतृत्व मोठया संख्येने उदयास आले हे त्याचे सर्वात मोठे यश आहे.

***8.मराठी भाषेचे भक्त :—***

यशवंतराव चव्हाणांच्या काळात भाषिक आधारावर भारतात घटक राज्यांची निर्मिती झाली होती. परंतू मराठी भाषिकांना आपले महाराश्ट्र राज्य मिळविण्यासाठी प्रदिर्घ लढा द्यावा लागला. त्यावेळी यशवंतराव सत्ताधारी होते. तो काळ त्यांच्या कसोटीचा होता. कारण ते मराठी प्रेमी होतेच त्याचबरोबर महाराष्ट्रवादी मंडळीची न्यायमागणी पूर्ण करणेसाठी त्यांना अनेक खडतर संकटांना सामोरे जावे लागले. अर्थात त्यांच्या मुत्सद्दीपणामुळे मराठी भाषिकांना शेवटी न्याय मिळाला आणि यशवंतराव हे मराठी भाषिक महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्रीही झाले. भाशिक राज्याचे समर्थन करतांना यशवंतराव म्हणतात की, '' आर्थिक समानता व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी जनभाषेतून राज्यकारभार झाला पाहिजे '', म्हणून त्यांनी सत्तेवर येताच मराठी भाषेला राज्यभाषेचा दर्जा मिळवून दिला. तसेच सर्व क्षेत्रांतील ज्ञान मराठीमध्ये उपलब्ध व्हावे म्हणून त्यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या नेतृत्वाखाली मराठी विश्वकोश निर्मितीचे कार्य सुरु केले. मराठी भाषा ज्ञानसंपादनाची भाषा बनविली. ती जास्त समृध्द व्हावी म्हणून भाशा संचालयनाची निर्मिती केली. शासकीय कार्यालयातही कामकाज मराठी भाषेतून सुरु केले. तालुका व जिल्हा स्तरावरील सरकारी कार्यालयातही मराठीचा वापर झाला पाहिजे. असा आदेश दिला. साहित्याबरोबरच नाटयक्षेत्र हा मराठी मनाचा व भाषेचा मानबिंदू आहे हे ओळखून नाटयकलेला प्रोत्साहन देवून कलावंतांना शासनातर्फे आर्थिक मदत देण्याची प्रथा त्यांनी सुरु केली.

### *9.साहित्य, कला, संगीत, संस्कृतीचे उपासक :–*

यशवंतराव चव्हाण हे राजकारण व साहित्य याचे गोड मिश्रण होते. साहित्याचे ते रसिक होते. आपले राज्य आघाडीवर देशात क्रमांक एकचे व्हावे यासाठी प्रत्येक नेता प्रयत्नशील असतोच पण केवळ आर्थिक संपन्नता म्हणजे सर्वकांही नसते. सांस्कृतिक क्षेत्रात आपण पुढे जायला हवे, हा विचार अधिक महत्वाचा असतो. समाजातील लेखक, कवी, कलाकार या सर्वांनी सुसंस्कृत महाराष्ट्र घडवावा यासाठी त्यांनी मुख्यमंत्री झाल्यानंतर लगेच 21 डिसेंबर 1960 रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाची स्थापना केली. तमाशाकलेला प्रोत्साहन देण्यासाठी तमाशा बोर्ड स्थापन केले. तमाशाचे लोकनाटय असे नामकरण केले. नाटयकलेला प्रोत्साहन देण्यासाठी नाटयमहोत्सव आणि नाटयशिबिरेही त्यांनी सुरु केली. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरवण्यास प्रोत्साहन देवून त्यांना शासनांमार्फत अनुदान देण्याची प्रथाही सुरु केली. 1974 मध्ये इचलकरंजी येथे झालेल्या मराठी साहित्य समेलनास रसिक म्हणून तर 1975 साली कराड येथे दुर्गा भागवत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संमेलनात स्वागताध्यक्ष म्हणून उपस्थित होते. महाराष्ट्रातील कलावंतानांही आर्थिक मदत देण्याची प्रथा त्यांनी सुरफ केली. तसेच शासनामार्फत साहित्यिक, कलावंताचा गौरव करण्याचे धोरण स्वीकारले. बालगंधर्वांना मासिक 300 रु. तर राजकवी यशवंत तांदळे यांना मासिक 400 रु. चे मानधन सुरु केले. ते कलेचे उपासक व संगीताचे भोक्ते होते. यशवंतराव हे थोर साहित्यिकही होते. त्यांचे सहयाद्रीचे वारे, युगांतर (भाशणसंग्रह) ऋणानुबंध, कृष्णाकाठ ;आत्मचरित्रद्ध भूमिका, विदेश–दर्शन इ. साहित्य प्रकाशित झाले आहे.

### *10.बेरजेचे राजकारण :–*

यशवंतरावांनी एकसंघ समाज, एक जिनसी आणि समृध्द संपन्न राज्य बनविण्याचे धोरण स्वीकारले. त्यासाठी विविध उपक्रम व योजना त्यांनी सुरु केल्या. वेळोवेळी आपली भूमिकाही अतिशय नेमक्या व स्पष्ट शब्दात मांडली. यशवंतरावांचे बेरजेचे राजकारण हे सोयीचे आणि दुसरे पक्ष फोडून आपले बहुमत बनविण्या एवढे स्वार्थी व खालच्या पातळीचे नव्हते. महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांनी बेरजेचे राजकारण सुरु केले. त्यामागे त्यांचा मुख्य उद्देश विरोधी पक्षातील कर्तबगार, अनुभवी नेते तसेच समविचारी पक्ष कॉंग्रेसबरोबर यावेत आणि सर्वांनी एकसंघपणे राज्याचा विकास करावा हा होता. म्हणूनच त्यांनी नागरपूरकरांना आपलेसे करण्याचा प्रयत्न केला. तसाच म. गांधीवधानंतर विस्थापित झालेल्या ब्राम्हण समाजाच्या दुःखावर फुंकर घालण्याचाही प्रयत्न केला. 1957 च्या निवडणूकीत कॉंग्रेसचे ब्राम्हण नेतृत्व पराभूत झाले. तरी डॉ. नरवणेना मंत्रिमंडळात घेतले. बाळासाहेब भारदे यांनाही सभापती पद दिले. साहित्यिक, आधुनिक वाल्मिकी ग.दि. माडगूळकरांना विधानपरिषदेवर घेतले. साहित्य, नाटक या बौध्दीकक्षेत्रात व प्रशासनात ब्राम्हणांना अग्रक्रमाने स्थान दिले. दुसरीकडे महारांची वेठबिगारी संपवून दलित समाजाला ही आपलेसे केले. त्यामुळे अनेक रिपब्लिकन नेते कॉंग्रेसमध्ये येत राहिले. तसेच शे.का.पक्ष व इतर विरोधी पक्षातील कर्तृत्ववान नेत्यांना सत्तापदे देवून कॉंग्रेसमध्ये आणले. विरोधकांच्या सहकारी संस्था, उद्योगधंदे, योजनांना मदत केली. सहिष्णुतेच्या धोरणांचा वापर करुन विरोधकोंनाही आपलेसे केले. समाजातील विविध जातीजमातींना सत्तापदे दिली. अशाप्रकारे बहुजनांचे राज्य आणि बेरजेचे राजकारण असे एकत्र आणून त्यांनी एकसंघ समाजाच्या दृष्टीने महत्वाची पावले टाकली.

### *11.प्रशासकीय सुधारणा :–*

यशवंतराव हे स्वतःच उत्तम, कुशल प्रशासक होते. लोकशाहीत लोकप्रतिनिधीबरोबरच प्रशासनातील अधिका–यांना किती महत्व आहे हे त्यांना माहीत होते. पंचायत राज्य योजनेतून सत्ताविकेंद्रीकरण झाले. तसेच ते निर्णयप्रक्रियेचे आणि अधिकार व जबाबदारीचे झाले पाहिजे आणि त्यासाठी तसे समर्थ अधिकारी हवेत अशी त्यांची भूमिक होती. लोकाभिमुख व जनहिताचे निर्णय अधिका–यांना विश्वासात घेवून त्यांच्याकडून खुबीने त्याची कार्यवाही करावी असे त्यांचे मत होते. शासनाचे यशापयश, धोरणांची अंमलबजावणी व राज्याचा विकास हा प्रशासनावर अवलंबून असतो. म्हणून त्यांना अधिकार द्यावेत तसेच प्रशासकांनीही येणारी जबाबदारी, कर्तव्य पार पाडावी अशी भूमिका त्यांनी मांडली.

### *12.दलितोध्दाराचे कार्य :–*

यशवंतराव वृत्तीने व कृतीने समतावादी व मानवतावादी होते. ब्राम्हण संघर्ष त्यांना मान्य नव्हता. म. फुल्यांच्या समतावादी विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता. शेतकरी समाजाची होणारी पिळवणूक, दलित समाजावर होणारा अन्याय आणि शिक्षणापासून वंचित ठेवलेला बहुजन समाज व स्त्रिया यांचे प्रश्न सोडविल्याखेरीज देशाची प्रगती होणार नाही असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यांनी महार समाजाला गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी 1958 साली कायदा करुन, महार वतनाची अनिष्ट प्रथा बंद करुन टाकली, इनामी जमिनी त्यांच्या मालकीच्या केल्या. नवबौध्दांना शासकीय सवलती पूर्वीप्रमाणेच सुरु ठेवल्या. नागपूरची दीक्षाभूमी आंबेडकर स्मारकासाठी दिली. तसेच 14 एप्रिल या आंबेडकर जयंतीदिनी सुट्टी देण्याची प्रथा सुरु केली. याशिवाय म. गांधीजींच्या मंदिर प्रवेश चळवळीत कराड भागात प्रत्यक्ष भाग घेतला. अशाप्रकारे यशवंतराव चव्हाण हे दलित मित्र होते.

महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी यशवंतरावांनी आणखीही कांही महत्वाचे निर्णय घेतले. मुंबई शहराला दुध पुरवठा करण्यासाठी वरळी दूध योजना 7 नोव्हेंबर 1961 ला सुरु केली. या 'आरे डेअरी' मध्ये डेअरी टेक्नॉलॉजी संस्था स्थापन करुन भारतीय दुग्धालय पदविका अभ्यासक्रमही त्यांनी सुरु केला. कोकण रेल्वेचा श्रीगणेशाही यशवंतरावांनीच सुरु केला. मुख्यमंत्री निधीतून आपत्ती, नडलेल्यांना मदत देण्याची प्रथा सुरु केली. 1948 साली गांधीवधानंतर झालेल्या ब्राम्हण लोकांच्या घरांच्या जाळपोळीत दिलेली कर्जे त्यांनी माफ केली. महाराष्ट्र निर्मितीच्या काळात नागपूर करारानुसार ठरल्याप्रमाणे राज्यविधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूरला घेण्याची प्रत्यक्ष कार्यवाही सुरु केली. मृतप्राय होत चाललेल्या नाटयसंस्थेला संजीवनी दिली. तसेच नवीन चित्रपट निर्मितीला उत्तेजन देण्यासाठी करपरतीची योजना सुरु केली. अशाप्रकारे महाराष्ट्राच्या आर्थिक, औद्योगिक जडणघडणीबरोबरच सांस्कृतिक जडणघडण व्हावी यासाठी यशवंतराव चव्हाण सतत प्रयत्नशील असत. त्यांची सगळी कारकीर्द समर्पित वृत्तीची, मूल्यांची जोपासना करणारी आणि विलक्षण प्रेरणादायी आहे. म्हणूनच त्यांना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, जनक असे म्हटले जाते.

### *निष्कर्ष :–*

यशवंतराव चव्हाणांच्या व्यक्तीमत्वाचा व कार्याचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, त्यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेतला होता. यशवंतराव हे द्रष्टे, मुत्सद्दी, सुसंस्कृत, कर्तबगार, प्रज्ञावंत, विवेकवंत, दिलखुलास, पारदर्शी स्वच्छ प्रतिमेचे, राष्ट्रनिष्ठ, ध्येयनिष्ठ, लोकसंग्राहक, नेते घडविणारे नेते असे सर्वमान्य लोकनेते होते. तसेच कुशल व खंबीर प्रशासक, फर्डे व अभ्यासू वक्ते, साहित्यिक,

पुस्तकप्रेमी, सजग, संयमी नेते असे अष्टपैलू व्यक्तिमत्व यशवंतरावांचे होते? महाराष्ट्राचे ते लाडके साहेब होते.

असे असले तरी यशवंतराव चव्हाणांच्यावर अनेक प्रकारची टीकाही झाली. संयुक्त महाराष्ट्र लढया दरम्यान त्यांनी घेतलेली राज्यापेक्षा नेहरु मोठे ही भूमिका वादग्रस्त ठरली. बेरजेचे राजकारणाच्या नावाखाली राज्यातील शे.का.पक्षासारखे अनेक विरोधी पक्ष कमकुवत बनविले. राज्य व राष्ट्रीय पातळीवरच्या एकूण राजकारणात नेमकी स्पष्ट व योग्य भूमिका त्यांनी घेतली नाही. त्यामुळे दुटप्पीपणाचा आरोपही त्यांच्यावर झाला. त्यातूनच कुंपणनीती, यशवंतनीती हे शब्दप्रयोग प्रचारात आले. सुरुवातीस 'महाराष्ट्राचे प्रतिशिवाजी' अशी जनमानसात त्यांची प्रतिमा होती. परंतु राष्ट्रीय राजकारणात त्यांनी आपला म्हणावा तसा करारीपणा, स्वाभिमान दाखविला नाही. जनमताचा पाठिंबा असतांना, संधी येवूनही त्यांनी राष्ट्रीय नेतृत्वाच्या स्पर्धेत न राहता सतत दुय्यम भूमिका स्वीकारली.

वरील प्रकारचे आरोप, टीका यशवंतरावांच्यावर होत असली तरीही तत्कालीन परिस्थितीचे आकलन करुन, प्रवाहात राहण्याचा सूज्ञपणा त्यांनी दाखविल्यामुळेच ते अनेक वादळात, संकटातही अखेरपर्यंत टिकून राहिले. याचे श्रेय त्यांच्या मुत्सद्दी राजकारणाला द्यावे लागेल. देवराष्ट्रेसारख्या ग्रामीण व गरीब कुटूंबातून आलेल्या, कोणत्याही प्रकारचा राजकीय वारसा, राजकीय गुरु नसलेल्या एका सामान्य व्यक्तीने जनतेच्या पाठिंब्यावर व स्वतःच्या कर्तृत्वावर राज्य, राष्ट्रीय पातळीवर महत्वाची पदे भूषविली. तसेच 40 वर्षे सत्तेत राहूनही आपली स्वच्छ प्रतिमा अखेरपर्यंत ठेवली आणि राजकारणाला सामाजिक आशय देवून विचार व मूल्यावर आधारित असे राजकारण त्यांनी केले. आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत, जडणघडणीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. महाराष्ट्रातील कृषी औद्योगिक क्षेत्राच्या विकासाचा पाया घालून राज्याला प्रगत, पुरोगामी व अग्रेसर राज्य बनविले. कॉंग्रेस पक्षाची राज्यात चांगल्या पध्दतीने संघटनात्मक बांधणी त्यांनी केली होती. महाराष्ट्र राज्य आज देशात विविध क्षेत्रात आघाडीवर आहे. त्याचा पाया घालण्याचे महत्वपूर्ण कार्य त्यांनी केले. त्याचेच हे फळ आहे. हे कुणालाही नाकारता येणार नाही. थोडक्यात संयमी, समाजवादी, लोकशाहीवादी, मुत्सद्दी, सुसंस्कृत, सजगदृष्टीचा, व्यवहारचातुर्य, जाणता व अजोड असा नेता यशवंतराव चव्हाणांच्या रुपाने लाभला हे महाराष्ट्राचेच नव्हेतर भारताचेही भाग्य म्हणावे लागेल.

## *संदर्भ ग्रंथ*


| | | |
|---|---|---|
| 01 | डॉ. मेहेंदळे विश्वास | यशवंतराव ते विलासराव |
| 02 | संपादक केळकर भा.कृ. | यशवंतराव राष्ट्रीय व्यक्तिमत्व |
| 03 | डॉ. पाटील वा. भा. | स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकीय विचारवंत |
| 04 | डॉ. खांदवे एकनाथ | महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण |
| 05 | पाटील विलास | महाराष्ट्र शासन व राजकारण |
| 06 | साने रविकिरण व नीलिमा | महाराष्ट्राचे शासन व राजकारण |
| 07 | साने रविकिरण | लढा संयुक्त महाराष्ट्राचा |
| 08 | के. सागर | महाराष्ट्रातील समाजसुधारक |
| 09 | चौगुले सहदेव | पाथेय |
| 10 | पाटील रा.तु. | यशवंतराव चव्हाण– एक कर्तबगार पण वादग्रस्त मुत्सद्दी नेता |
| 11 | पवार बाबुराव नि. | सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र –विचार मंथन<br>संशोधन पत्रिका जाने. 2012 |
| 12 | संपादक जाधव तुकाराम | महाराष्ट्र वार्षिकी 2010 (सुवर्ण महोत्सवी वर्ष) |
| 13 | डॉ. शिंदे आबासाहेब | सताराचे प्रति सरकार |
| 14 | पाटील रा.तु. | संगली – साता–याचे राजकारण |
| 15 | डॉ. पाटील दिनकर | पत्ररुप यशवंतराव चव्हाण |
| 16 | पाटील दिनकर व पवार जे.के. | प्रस्तावनकार यशवंतराव चव्हाण |
| 17 | पवार बाबुराव नि. | अप्रकाषित एम.फिल शोधनिबंध (शि.वि.कोल्हापूर) बळीराजा स्मृतीधरण : राजकीय विश्लेषण |
| 18 | पवार शरद, जोशी रामभाउ, धारिया मोहन, जाधव प्रतापसिंह, घोरपडे अशोक, प्रधान राम, बाळ प्रकाश, वाघमारे जनार्दन | यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी<br>(2012-13) वर्ष विशेष लेख<br>दै. लोकसत्ता, लोकमत, पुढारी, तरुणभारत, सकाळ<br>(दि. 11 व 12 मार्च 2012) |

## Publish Research Article
## International Level Multidisciplinary Research Journal
## For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium  Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net